सर्वोच्च न्यायालय व न्यायालयीन सक्रियतेचा विश्लेषणात्मक अभ्यास : कालखंड २००७ ते २०१६

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र या विषयात पीएच.डी. पूर्व पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

प्रा.मलदोडे साहेबराव रामराव
स.प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री.संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा

मार्गदर्शक

प्रा.डॉ.विलास आघाव

सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग प्रमुख

आदर्श महाविद्यालय, हिंगोली, जिं.हिंगोली

ऑक्टोबर २०२०

प्रस्तावना (Introduction)

लोकशाही राजकीय व्यवस्थेचे सक्षमीकरण, मूलभूत अधिकारांचे संरक्षण, संघराज्य शासन व्यवस्थेचे बळकटीकरण आणि राज्यघटनेची मूलभूत चौकट व बदलत्य सामाजिक व राजकीय परिस्थितीत सामाजिक आणि राजकीय न्यायाची स्थापना व्हावी, या हेतूने लोकशाही या ासनाचा रखवादलार म्हणून सर्वोच्च न्यायालयाकडे बघीतले जाते. याशिवाय भारताची एकता, अखंडता आणि राष्ट्रीयत्वाची भावना अबाधित राखण्याच्या दृष्टीने व कायद्याची आणि न्यायाची एकेरी पद्धत असावी असे घटनाकारांना वाटले होते. यातूनच ाारतात सर्वोचच न्यायालयाची स्थापना २६ जानेवारी १९५० रोजी झाली असे जरी असले तरी न्याय ही संकल्पना इ.स.पूर्व कालखंडात मांडली गेली.

इ.स.पूर्व ४२७ ते ३४७ या कालखंडात प्लेटो या पाश्चात्य राजकीय विचारवंतांनी न्यायाला विशेष महत्त्व देऊन आत्म्यामुळे जसे शरीराला पूर्णत्व येते तसे न्यायामुळे आदर्श राज्याला पूर्णत्व येते असे त्याने म्हटले आहे. त्याच्या मते, न्याय म्हणजे प्रत्येकाला त्याच्या आवडीप्रमाणे व कुवतीप्रमाणे काम मिळणे व ते त्याने जाणीवपूर्वक जबाबदारीने पूर्ण करावे. तसेच समाजातील तिन्ही वर्गानी एकमेकांच्या कार्यात हस्तक्षेप न करता आपापली कार्य पार पाडावीत न्यायामुळे संघर्ष नाहीसा होतो व राज्यात एकता व सुख निर्माण होऊन आदर्श राजयाची निर्मिती होते.

प्लेटोच्या नयाय संकल्पनेनंतर राज्यशास्त्राचा जनक ॲरिस्टॉटल या चिारवंतांनी देखील इ.स.पूर्व ३८४ ते ३२२ या कालखंडात न्याय आणि राज्यघटनेसंबंधी आपले विचार मांडले. समाजाचा इतिहास आणि मानवी जीवनातील भलेबुरे अनुभव हे ही राज्यघज्ञटना बनवितांना जमेच्या बाहू असतात. तो पुढे जाडफन असेही म्हणतो की, राज्यघटना सार्वभौम असावी तरच राज्याचा पाया बळकट होईल. राज्यघटनेची आधारभूमी न्याय आणि नीति असून राज्यशास्त्र हे सर्व शास्त्रत श्रेष्ठतम शास्त्र होय. या शास्त्राचा पाया न्या आणि न्या म्हणजे सामाजिक कल्याणाची पूर्तता होय. म्हणूनच राज्याला संपत्ती आणि स्वातंत्र्य याची जेवढी गरज असते, तेवढीच न्याय आणि शौर्य यांचीही असते.

प्राचीन भारतीय इतिहासात इ.स.पूर्व ४ थे शतकात कौटिल्य, विष्णुगुप्त आणि चाणक्य या एकाच नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्राचीन भारतीय राजकीय विचारवंताने चंद्रगुप्त मौर्य या राजाला राज्यकारभाराबद्दल धडे देतांना राजामध्ये काही गुण असावेत अशी अपेक्षा केली. राजकाकडून कारभाराकडे दुर्लक्ष होऊ लागले म्हणजे त्याचे नोकरही दुर्लक्ष करतात. त्यामुळे राज्याच्या कार्याच्ी हानी होते. अशा राजाला त्याचे शत्रू सहज फसवितात. न्यायदान आणि नि:पक्षपती आचरण ही राजाची व्रते आहेत असे तो म्हणतो.

कौटिल्य यांनी राजाला न्यायाचा प्रमुख स्त्रोत मानले होते. न्यायामुळे अपराध्यास शिक्ष मिळते आणि प्रजेच्या जीवित आणि वित्ताचे संरक्षण होते. न्यायदान नि:पक्षपाती पद्धतीने करण्यावर कौटिलयाने जोर दिला. त्याने धर्मस्थिय न्यायालय आणि कंटक शोधन न्यायालय अशा दोन भागात न्यायाची विभागणी केली. आजच्या परिस्थितीत तपासायचे झाल्यास दिवाणी व फौजदारी असे शब्द उपयुक्त ठरू शकतात. न्यायालयात साक्षीदार प्रस्तुत करता येवू शकतील. परंतु ते विश्वसनीय आणि चारित्र्यसंपन्न असावेत या न्यायालयाच्या राजयात अनेक शाखा असाव्यात आणि सर्वोच्च न्यायालय म्हणून पुरोहित, मंत्री आणि राजाने कार्य करावे ही महत्त्वाची भूमिका कौटिल्याने मांडलेली दिसते.

ब्रिटिशांनी भारतात राजकीय सत्ता स्थापन केल्यानंतर वेगवेगळे कायदे संमत केले. त्याचबरोबर न्याय संस्थेची देखील स्थ्ज्ञापना केली. इ.स.१८६१ च्या सनदेनसार ब्रिटिश कायदे भारतात लागू करण्यात आले. १७२६ मध्ये मुंबई, म्ा्रदास आणि कलकत्ता या ठिकाणी न्यायालयाची स्थ्ज्ञपना करण्यात आली. परंतु अद्यापपावेतो कायद्याची संहिता रूढ नसल्यामुळे अंमलबजावणी व न्यायदान या क्रिया एकत्रित होत. मात्र गव्हर्नर जनरल वॉर्न हेस्टींग्ज यांनी दिवाणी व फौजदारी न्यायालयासंदर्भात महत्त्वूपर्ण निर्णय घेतले. १७७३ च्या रेगुलेटिंग ॲक्टनंतर बंगालमध्ये सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. पहिल्यांदा ब्रिटिश कायद्यानुसार न्यायदान भारतात सुरू झाले. लॉर्ड कार्नवलीसने महसुलविषयक खटले व दिवाणी न्यायालये कमीत कमी केली व ते अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे दिले. इ.स.१८६१ मध्ये इंडियन हायकोर्ट ॲक्ट मंजूर करून मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथे उच्च न्यायालये स्थ्ज्ञापन करण्यात आली.

सर्व माणसांना स्वातंत्र्य उपभोगता यावे. सर्वांना समान संधी मिळावी. व्यवस्थेने हक्काची व कर्तव्याची कार्यवाही होण्याकरिता एक न्याययंत्रणा असावी ही न्याय संकल्पनेची आवश्यक अंगे होत. न्याय म्हणजे योग्य नैतिक अशा मानवी व्यवस्थेला आणि त्यातील व्यवहाराला न्याय म्हटले जाते. गुलामगिरी, वर्णभेद, जातीभेद, स्त्री-पुरूष असमानता, सामाजिक व आर्थिक विषमता या अन्यायी व्यवस्थेत असतात. म्हणून अन्यायी व्यवस्थेचे न्यायीक व्यवस्थेत परिवर्तन करण्याची प्रक्रिया सातत्याने कार्यरत असावी लागते. तरच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात न्याय प्रस्थापित होईल.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी ब्रिटिशांच्या १९३५ च्या भारत प्रशासन कायद्यानुसार सांघिक न्यायालयाची निर्मिती करण्यात आली होती. परंतु हे सांघिक न्यायालय भारताचे अंतिम न्यायालय नव्हेते. कारण इंग्लंडमधील प्रिव्ही कॉन्सिल नावाच्या संस्थेचे नियंत्रण या न्यायालयावर होते. भारतात २६ जानेवारी १९५० रोजी सर्वोच्च न्यायालयाची स्थापना होईपर्यंत प्रिव्ही कॉन्सिल हेच अंतिम न्यायालय होते.

२६ जानेवारी १९५० रोजी भारताच्या राज्यघटनेची अंमलबजावणी होऊन राज्यघटनेच्या १२४ व्या कलमानुसार सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली. भारताची राज्यघटना लिखित असल्यामुळे आणि शासन व्यवस्थेचे स्वरूप संघराज्यात्मक बनविल्यामुळे, संघराज्य व राज्ज्यघटनेच्या रक्षणासाठी आणि लोकशाही राजकीय व्यवस्थेतून देण्यात अलेल्या मूलभूत हक्काच्या रक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली.

कायदे मंडळाने सेंमत केलेले कायदे जर राज्यघटनेशी सुसंगत नसतील तर ते घटनाबाह्य ठरविण्याच्या न्याय मंडळाच्या अधिकारास न्यायालयीन पुर्नविलोकनाचा अधिकार म्हणतात. या अाकिाराद्वारे न्यायालयाला राज्यघटनेचा अर्थ लावता येतो. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने प्रथकम १८०३ मध्ये या अाकिाराबाबात दावा केलेला दिसतो. भारतात मूलभूत हक्काच्या संदर्भात राज्यघटनेचा अन्वयार्थ लावण्याचा व कायदेमंडळाला राज्यघटनेशी विसंगत कायदा घटनाबाह्य घोषित करण्याचा अाकिार न्यायमंडळालास आहे. त्यामुळे कायदेमंडळापेक्षा न्यायमंडळ वरचड ठरते. परंतु कायदेमंडळाने केलेला कायदा हा जनइच्छेतून केलेला

असल्यामुळे कायद्यावर संसदेचा प्रभाव अधिक असतो. लोकप्रतिनिधींनी केलेला कायदा रद्द करो म्णे जनतेच्या भावनेची कदर न करणे होय, अशीही भावना व्यक्त केली जाते.

सुरुवातीच्या काळात कायद्यानुसार निर्णय देणे हे न्यायालयाचे काम होते. यानुसारच न्यायपालिका काम करीत होती. परंतु १९७० नंतर न्यायपालिकेच्या असे लक्षात आले की, घटनेतील शुष्क शब्दापेखा घटनेची भावना व आतमाक महत्त्वाची आहे. घटनेच्या भावनेची कदर करणे गरजेचे आहे. यासाठी न्यायालयाने परंपरागत न्यायाची तांत्रिकता बाजूस ठेवून काम केले पाहिजे व घटनेच्या बाबतीत रचनातमक काम केले पाहिजे ही भूमिका घेतली. केंद्रीय व राजयातील कायदेमंडळानी व कार्यकारी मंडळानी आपले काम योग्य पद्धतीने पार पाडले असते. संविधानाची भावना लक्षात घेऊन काम केले असते तर भारतात न्यायालयीन कृतीशीलता अस्तीत्वात आली नसती म्हणूनच साधारणतः १९८० च्या जवळपास न्यायालयीन सक्रियतेचा उदय झाला. न्यायालयीन सक्रियेतेचा प्रारंभ प्रथम सर्वोच्च न्यायालयापासून झाला. त्यानंतर उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय व एवढेच नाही तर आज अगदी खालच्या न्यायालयांनी देखयील सक्रियता दाखविण्यास सुरूवात केलेली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व (Importance of Research)

त्येक सभ्य राज्यासाठी स्वतंत्र निःपक्षीय न्यायमंडळ असणे आवश्यक आहे. शासन संस्थ्ज्ञा निरनिराळे कायदे तयार करते. परंतु त्या कयद्याचे पालन प्रत्येकजन करतोच असे नाही. म्हणून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीची चौकशी करून तिला निःपक्षी आणि सुडबुद्धीरहीत वृत्तीने न्याय देणे, अशा गुन्हेगाराला योग्य शिक्षा देणे अत्यावश्यक आहे. म्हणून प्रा.गानर असे म्हणतात की, न्यायविभागाचे अभावी एका सभ्य राज्याची कल्पन७ा करणे अशक्य आहे. कोणत्याही राज्याचे श्रेष्ठत्व जाणण्यासाठी तेथील न्यायव्यवथेची निपुणता ह्या कसोटीपेक्षा श्रेष्ठ कोणतीच नाही असे विचार लॉर्ड ब्राईसने व्यक्त केले आहेत.

घटनेचे संरक्षण संविधानाच्या ३२ व्या कलमानुसार सर्वोच्च न्यायालय मूलभूत अधिकारांचे संरक्षण आहे. संघराज्य, घटकराज्य अथवा कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांचेकडून मूलभूत अधिकारावर आक्रमण होणार नाही हे पाहण्याचे कार्य सर्वोच्च

न्यायालयाचेच आहे. म्हणून सर्वोच्च न्यायालयाला न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार दिला आहे.

भारताचे पहिले महान्यायवादी एम.सी.सेटलवाड यांनी १८ जानेवारी १९५० रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या उद्घाटन प्रसंगी असे चिार व्यक्त केले की, संविधानात असलेले मूलभूत अधिकार आणि त्यावर घातलेले प्रतिबंध ह्यामुळे विवेकशील आणि बुद्धीप्रधान निर्णयाचीच लोक अपेक्षा करतात.

भारतीय संविधानाचे भविष्य आणि तिचा विकास हा बहुतांशी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयवर आणि त्याने दाखविलेलया दिशेवरच आवलंबून राहिल. सर्वोच्च न्यायालयाला घटनेचे संरक्षण करताना समाजातील प्रतिद्वंद्वी शक्तीशी वेळोवेळी सामाना करावाला लागेल. घटनेचे संरक्षण करताना सर्वोच्च न्यायालयाला ज्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पार्श्वभूमीवर घटना निर्माण झाली त्या गोष्टीचा विचार करणे. तसेच परस्पर विरोधी शक्तीमध्ये समन्वय साधणे हे सर्वोच्च न्यायालयाचे कर्तव्य आहे. असे महत्त्वपूर्ण उद्गार श्री अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांनी काढले.

सर्वोच्च न्यायालयाचे आणखी एक महत्त्व असे की, ते शासाच्या विभिन्न विभागामध्ये सामंजस्य निर्माण करते. संविधानाची अंतिम व्याख्या करून कार्यकारी आणि कायदेकारी मंडळाला आणि राज्य सरकारांना त्यांच्या अधिकारक्षेत्रातच कायम ठेवते.

सर्वोच्च न्यायालयाला घटनात्मक कलमांचा अर्थ लावण्याचा अधिकार असून नागरिकांच्या मूलभूत हक्काचे रखण करावे लागते. याशिवाय संघराज्यात्मक शासन व्यवस्थेचा स्वरूपामुळे केंद्रकसरकार आणि राज्यसरकार यांच्यातील अधिकार वाटपाबाबत निर्माण झ ालेला वाद मिटविण इत्यादी साठी न्यायालयाचे अनन्य साधारण महत्त्व असून कायदेमंडळ कार्यकारी मंडळ या शाखांची कायदे करणे व अंमलबजावणीबाबत हुकुमशाही निर्माण होऊ नये यासाठी एक घटनात्मक संस्था म्हणून न्यायालयाकडे बघितले जाते. भारताने संसदीय लोकशाही या राजकीय व्यवस्थेचा पुरस्कार केल्यामुळे संसदेतील प्रतिनिधींवर लोकांचे लक्ष असावे जेणेकरून संसदीय लोकशाहीकडे देशाची वाटचाल होईल व या तरतुदीचे उल्लंघन

होऊ नये व घटना हा सर्वोच्च कायदा आहे याकडे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाचे लक्ष वेधणे यासाठी न्यायालयाचे महत्त्व नाकारता येत नाही.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Research)

१. न्याय संकल्पनेच्या उगम व विकासाचा अभ्यास करणे.
२. न्यायालयीन प्रक्रियेचा अभ्यास करणे.
३. न्यायालयीन सक्रियतेच्या आवश्यकतेचा शोध घेणे.
४. न्यायालयीन सक्रियता निर्माण होण्याची कारणे शोधणे.
५. न्यायालयीन सक्रियतेच्या प्रभावाचा अभ्यास करणे.
६. २००७ ते २०१६ या काळातील न्यायालयीन सक्रियतेचा अभ्यास करणे.
७. न्यायालयीन सक्रियतेचा समाज, राजकारण व संस्थावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके (Hypothesis of the Research)

१. न्याय ही संकल्पना इ.स.पूर्व कालखंडापासून उदयास आली आहे.
२. न्यायालयीन प्रक्रिया महत्त्वपूर्ण आहे.
३. न्यायालयीन सक्रियता ही संकल्पना आवश्यक आहे.
४. न्यायालयीन सक्रियता दुर्बल घटक व सामाजिक न्यायाला वाचा फोडण्यासाठी निर्माण झाली.
५. न्यायालयीन सक्रियतेचा प्रभाव १९९० ते २०१६ या काळात दिसून येतो.
६. २००७ ते २०१६ या काळात न्यायालयीन सक्रियतेने महत्त्वाची भूमिका बजावली.
७. न्यायालयीन सक्रियतेने विविध क्षेत्रात मोलाची भूमिका बजावली.

तस्थ संकलना (Data Collection)

प्रस्तुत संशोधनात तथ्ये संकलन करण्यासाठी ग्रंथालयाचा वापर करण्यात येणार असून तथ्ये संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे. संशोधनाच्या एकूण चार पद्धतीपैकी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

दुय्यम साधणे (Secondary Sources)

तथ्य संकलनाच्या दुय्यम साधनांमध्ये प्रकाशित ग्रंथ, अनुवादीत ग्रंथ साहित्य, सर्वोच्च न्यायालय व न्यायालयीन सक्रियतेचे संदर्भ ग्रंथ, साहित्य, वर्तमानपत्रे, शोधप्रबंध, नियतकालीके, मासिके, त्रैमासिके, इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनाचा उपयोग प्रस्तुत संशोधन कार्यात तथ्य संकलनासाठी केला आहे.

संशोधन आराखडा (Research of Design)

कोणत्याही संशोधकापुढे संशोधन करताना निश्चित स्वरूपाचे उद्दिष्टे असते. हे उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून संशोधकाला आपल्या संपूर्ण संशोधनाची आखणी किंवा मांडणी करावी लागते. ही मांडणी अतिशय आवश्यक व महत्त्वाची असते. कारण अशा पूर्वनियोजित मांडणीतून किंवा निर्णयामुळे संशोधन भटकत नाही व योग्य त्या निष्कर्षाप्रत संशोधन पोहचण्यासाठी मदत होते.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना अभ्यासली जाणार आहे. तसेच सर्वोच्च न्यायालय व न्यायालयीन सक्रिये. विशेषतः हा अभ्यास २००७ ते २०१६ दरम्यानचा असेल. तसेच संशोधन विषयाचे महत्त्व, विषयाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधनाच्या पद्धती आणि प्रस्तुत अभ्यासा संदर्भात पूर्व संशोधकांनी व्यक्त केलेली मते अभ्यासली जाणार आहेत. तसेच संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या प्रकरणांचा प्रकरणनिहाय संक्षिप्त व नियोजन यांचे यथोचित विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : न्यायाचा उगम व विकास

शोध प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात न्यायाचा उगम व विकासाबाबत विश्लेषणात्मक अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण तिसरे : सर्वोच्च न्यायालय

या प्रकरणात भारतीय सर्वोच्च न्यायालयाची स्थ्ज्ञापना व स्थापनेमागील उद्देश, रचना आणि सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार व न्यायालयीन स्वतंत्रतेबद्दल विस्तृत विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : न्यायालयीन सक्रियतेचा उगम व विकास

शोधप्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात न्यायालयीन सक्रियता म्हणजे काय? हे सांगून कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाला एकाधिकारशाही पासून वाचविण्यासाठी व लोकशाही राजकीय व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी व समाजात सामाजिक न्यायाची स्थापना करण्याच्या दृष्टीने न्यायालयीन सक्रियतेचा विश्लेषणात्मक अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण पाचवे : न्यायालयीन सक्रियता एक विश्लेषण

पाचव्या प्रकरणात राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालयाला जी घटनात्मक जबाबदारी सोपविलेली आहे. याशिवाय राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात न्यायाची स्थापना व्हावी या हेतूने व भ्रष्टाचार, बेकारी, दहशतवाद, स्त्रीयांवरील होणारे अत्याचार, काळा पैसा इत्यादी बाबत जनहित योचिकेद्वारे हस्तक्षेप करून शासनाला ताकीद देणे व प्रसंगी त्याबाबत कायदा करण्यास भाग पाडणे इत्यादी बाबत विश्लेषणात्मक अध्ययन प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : न्यायालयीन सक्रियतेचा परिणाम

शोधप्रबंधाच्या सहाव्या प्रकरणात न्यायालयीन सक्रियतेचा समाज, राजकारण व वेगवेगळ्या संस्थावर झालेल्या परिणामाचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारशी

शोधप्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात न्यायालयीन सक्रियतेबाबत विश्लेषण करून योग्य ते निष्कर्ष व शिफारशी करण्यात येणार आहे.

संदर्भग्रंथ :-

१. रा.ना.घाटोले, सामाजिक संशोधन पध्दती
२. पु.ल.भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, तिसरी आवृत्ती, १९८७
३. गुरुनाथ नाडगोडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१
४. डॉ.प्रदीप आगलावे, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, जानेवारी २०००
५. डॉ.वा.भा.पाटील संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, सुधारीत आवृत्ती, २०१०
६. स.मा.गर्गे, भारतीय समाजविज्ञान, कोश खंड-१, द्वितीय आवृत्ती, सप्टेंबर २००७
७. स.मा.गर्गे, भारतीय समाजविज्ञान, कोश खंड-२, द्वितीय आवृत्ती, सप्टेंबर २००७
८. स.मा.गर्गे, भारतीय समाजविज्ञान, कोश खंड-३, द्वितीय आवृत्ती, सप्टेंबर २००७
९. प्रा.सुधाकर कुलकर्णी, निवडक राजकीय विचारवंत
१०. डॉ.बी.आर.जोशी, सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांताचा स्पष्टीकरणात्मक कोश, प्रथमावृत्ती, २००७
११. डॉ.भिमसेन रंगाचार्य जोशी, सामाजिक संकल्पना सिद्धांत कोश, प्रथमावृत्ती, २००७
१२. प्रा.ची.ग.घांगरेकर, व प्रा.पु.गो.कवठाळकर, भारतीय राजकीय व्यवस्था, दत्त सन्स सदर नागपूर, द्वितीयावृत्ती, १९९६

संशोधक

प्रा.मलदोडे साहेबराव रामराव

स.प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री.संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा

मार्गदर्शक

प्रा.डॉ.विलास आघाव

उप प्राचार्य व राज्यशास्त्र विभाग प्रमुख

आदर्श महाविद्यालय, हिंगोली, जिं.हिंगोली